विषय : बीअर धोरणात सुधारणा

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र.एमआयएस-११९९/सीआर-२८/इएक्ससी-३
मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दिनांक १९ ऑगस्ट २००३.

शासन निर्णय - राज्यात मद्यापासून मिळणारे उत्पन्न हे महसूल मिळवून देणा-या विविध बीबींपैकी एक प्रमुख स्त्रोत आहे.सध्या राज्यात निर्माण होणा-या मद्यापैकी तिव्र मद्याच्या विकीत वाढ होत आहे. त्याचप्रमाणे तिव्र व सौम्य मद्यातील प्रामुख्याने तीव्र बिअर व सौम्य बिअरच्या किंमतीत फारसा फरक नसल्यामुळे राज्यातील जनता विशेषता तरुण वर्ग तीव्र बिअरकडे वळू लागला आहे.राज्यातील तरुणवर्ग व्यसनाधीन बनू नये म्हणून तीव्र मद्याऐवजी सौम्य बिअरला काही प्रमाणात सवलती देऊन उपलब्धता वाढविणे तीव्र बिअर व सौम्य बिअरच्या किंमतीत तुलनात्मक फरक ठेवून तरुण पिढीस तीव्र मद्यापासून सौम्य मद्याकडे वळविणे तसेच इतर राज्यातील बिइरच्या किंमतीच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील बिअरच्या किंमतीतील तफावत काही अंशी कमी करुन राज्यातील बिअर निर्माण्यासमोरील असणा-या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने बिअर धोरणात सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने शासनाने आता खालील प्रमाणे निर्णय घेतले आहेत -

(१) सौम्य बिअरच्या निर्मिती मुल्याच्या ७५ / किंवा रु.१२.०० बल्क लिटर यापैकी जें जास्त असेल तेवढे उत्पादन शुल्क आकारण्यात यावे.

(२) सौम्य बिअरसाठी निर्मिती मुल्याच्या तीन पट कमाल किरकोळ विक्री किंमत (MRP) निश्चीत करण्यात यावी.

(३) तीव्र बिअरवर उत्पादन शुल्क रु.२० प्रती बल्क लिटर किंवा उत्पादन मुल्याच्या १००/ यापैकी जें जास्त असेल त्या दराने आकारण्यात यावे. तसेच तीव्र बिअरची MRP निश्चीत करण्यासाठी गुणांक ३.२५ ऐवजी ३.५० करावा.

(४) सीएल-३ अनुज्ञाप्तीधारकांना बंद बाटलीतून सौम्य/तीव्र बिअर विक्री करण्यासाठी पूरक अनुज्ञाप्ती देणे व त्यासाठी सीएल-३ अनुज्ञाप्तीच्या अनुज्ञाप्ती शुल्काच्या २५ टक्के रक्कम अनुज्ञाप्ती शुल्क म्हणून आकारणे.

(५) परमिटरुम (एफएल-३) व बीअरबार (ई) या लायसन्सधारकांना बंद बाटलीतून सौम्य/तीव्र बीअर विक्रीसाठी एक पुरक अनुज्ञाप्ती त्याच आस्थापनेच्या आवारात देणे व त्यासाठी परमीट रुमच्या अनुज्ञाप्ती शुल्काच्या २५ टक्के रक्कम अनुज्ञाप्ती शुल्क म्हणून आकारणे.

(६) नवीन बिअर शॉप्सना ( केवळ बंद बाटलीतून सौम्य/तीव्र बिअर विक्रीसाठी ) एफएल-२ (FLII)च्या धर्तीवर परवानगी देणे व त्यासाठी परमिटरुमला आकारण्यात येणा-या लायसन्स फीच्या २५ टक्के लायसन्स फी आकरणे. नविन बिअर शॉप्स डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये देखील मंजूर करता येतील.

(७) इच्छुक खाद्य पदार्थ अनुज्ञाप्ती ( Eating House Licence ) धारकांना आस्थापनेचे किमान क्षेत्रफळ व प्रसाधन गृहाच्या सद्याच्या अटींमध्ये शिथिलता देऊन सौम्य बइअर विक्रीसाठी ई नमुन्यात अनुज्ञाप्ती देणे व त्यासाठी बीअर बार लायसन्सधारकांना ( ई लायसन्सधारकांना ) जेवढे अनुज्ञाप्ती शुल्क आकारण्यात येते. तेवढे अनुज्ञाप्ती शुल्क आकारण्यात यावे.

(८) बीअर विक्री अनुज्ञाप्ती मंजूर करण्याचे अधिकार सध्या अस्तित्वात असलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीला असतील.

(९) बीअर वरील निर्यात शुल्क रुपये २/- प्रति बल्क लिटर रुपये १/- प्रति बल्क लिटर करण्यात यावे.

(१०) बीअर वरील आयात शुल्क रुपये ३/- प्रति बल्क लिटर वरुन रुपये ४/- प्रति बल्क लिटर करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-(ना.उ.रौराळे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन,गृह विभाग

कमांक.एमआयएस.११२००३/२९१२/अधी.

रत्नागिरी, २-९-२००३

सर्व निरीक्षक/दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, अधिकारी यांना माहिती व कार्यवाहीसाठी रवाना.

उक्त अधिका-यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त शासन पत्रामध्ये दिलेल्या सुचने प्रमाणे वरील अनुज्ञाप्ती घेण्यास अर्ज प्राप्त झाल्यास त्यावाबतचे प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करावेत.

अधीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क,रत्नागिरी.